31.22

ISBN-978-93-95494-00-7

# Current Trends in Humanities & Commerce

## Peer-Reviewed Book Chapter

Prof. Virag.S.Gawande
**Chief Editor**
Dr.Dinesh W.Nichit
**Editor**

**Published By**

**Aadhar International Publications**
**Amaravati**

ISBN-978-93-95494-00-7

**Current Trends In Humanities & Commerce**

Prof. Virag.S.Gawande
Dr. Dinesh W.Nichit

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means without permission. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

*First published, **August , 2022***

AADHAR PUBLICATIONS,
Amravati.

ISBN - **978-93-95494-00-7**

**Published by**
Prof. Virag Gawande for
Aadhar Publications,
Behind Govt. VISH,
New Hanuman Nagar,
Amravati – 444 604.

**Printed by**
Sarita Graphics,
Amravati
Price-350

ISBN-978-93-95494-00-7

# Index


| S.No | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | स्थानिक स्वशासनाचे महत्त्व प्रा.डॉ.कदम डी.एम. | 1 |
| 2 | ज्ञानरचनावाद : समाजाचा सर्वांगीण विकास प्रा.डॉ.तानाजी ज्ञानदेव पाटील | 10 |
| 3 | देशामध्ये झालेली चलनवाढ व त्याची कारणे प्रा. अनिल आर. राऊत | 14 |
| 4 | वारा वाजे रूणझुणा डॉ. रमेश बलभीम जाधवर | 18 |
| 5 | भारतीय शिक्षण प्रणाली व शाश्वत विकास : एक चिकित्सक अध्ययन डॉ. नरेंद्र केशव पाटील | 29 |
| 6 | भाषा,साहित्य कला आणि संस्कृती : एक विवेचन प्रा. डॉ.रवींद्र भाऊराव साखरकर | 38 |
| 7 | १८५७ की क्रांती के दौरान बुन्देली लोकगीतो से जनजागरण एक ऐतिहासिक सिंहावलोकन प्रा.डॉ. तिर्थनंद बन्नगरे | 44 |
| 8 | राष्ट्रसंतांची हिंदी भजने : सामाजिक मुल्ये डॉ. प्रवीण कारंजकर | 51 |
| 9 | औद्योगिक आजारपण : कारणे परिणाम आणि उपाय प्राध्यापक डॉ. कृष्णा शंकर शहाणे | 59 |
| 10 | महाराष्ट्रातील तरुणांसाठी भूशास्त्रातील संधीबाबत आढावा..... श्री भावेश दिनू पाटील | 68 |
| 11 | इतिहास संशोधनात पुरातत्त्वशास्त्र, तत्वे व पद्धतीचे महत्त्व जगदीश दौलतराव चिंचोळकर | 74 |
| 12 | स्वराज्य निर्मितीचे नेतृत्व करणाऱ्या राजमाता जिजाबाई भोसले यांच्या जन्म तिथीची सत्यता रविंद्र शंकरराव फटींग | 79 |

ISBN-978-93-95494-00-7



| | | |
|---|---|---|
| 13 | सर्वसमावेशक शिक्षण डॉ. एकनाथ द. वाजगे | 86 |
| 14 | साठोत्तरी दलित साहित्य प्रवाह<br>प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी | 97 |
| 15 | योग्य शेती विपणन पद्धतीतुन भारताचा आर्थिक विकास<br>प्रा. डॉ. साहेबराव दौलत निकम | 107 |
| 16 | अंगणवाडी केंद्र :– बाल्यावस्था देखभाल व विकास<br>डॉ. राजू के. माटे | 133 |
| 17 | नाझीवादाचे मानसशास्त्र कु. युगंधरा य. शिवणकर | 140 |
| 18 | WTO and India– WTO Agreement on Indian Agriculture **Dr. Santosh Premdas Rathod** | 147 |
| 19 | Cultural Hegemony in Ben Okri's Songs of Enchantment **Dr. D. R. Khanderao** | 154 |
| 20 | A Study of Automation and Networking of College Libraries Affiliated to Mumbai University<br>**Mrs. Deepa D. Patil** | 159 |
| 21 | Role Of Finance In Growth And Development<br>**Narendra D. Najardhane** | 169 |
| 22 | हिन्दी साहित्य में स्त्री विमर्श प्रा.डॉ. सुशांत सुरेंद्र ठोके | 173 |
| 23 | The Role of Nutrients in Child's Brain Development **Dr.Priti P. Gawande** | 177 |
| 24 | शेतकरी आत्महत्या आणि राजकारण<br>प्रा.गांगुर्डे रामदास भीमा | 184 |
| 25 | सत्यशोधक समाजाचे पुनरूज्जीवन आवश्यक<br>प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी | 195 |
| 26 | स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी कविता : एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ.पंढरी डोईफोडे** | 201 |

ISBN-978-93-95494-00-7

# स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी कविता : एक चिकित्सक अभ्यास

डॉ.पंढरी डोईफोडे
प्राध्यापक,संत भगवान बाबा कला महाविद्यालय,सिंदखेडराजा
जि.बुलडाणा -८८०६७०९३२७

---

प्रस्तावना

स्वांतंत्र्योत्तर कालखंडात शहरी बरोबरच ग्रामीण भागातल्या सर्व आर्थीक व सामाजिक स्तरांवरील स्त्रियांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होऊ लागल्या. स्त्रीत्वाचे नवे भान केवळ स्त्रियांनाच नव्हे, तर पुरूषांनाही होऊ लागले. स्त्रिवाद या संकल्पनेचा प्रभाव पुरूषांनाही होऊ लागला. स्त्रीवाद या संकल्पनेचा प्रभाव मराठी कावयि-त्रिंच्या कवितेवर प्रामुखाने नव्वदच्या दशकापासून दिसून येऊ लागला. स्त्रीला भोगावे लागणारे दु:ख, वेदना, समाजव्यवस्थेतील दुय्यमपणा याला पुरूषप्रधान व्यवस्थाच कारणीभूत असल्याची जाणीव व्यक्त होऊ लागली. स्त्रीला संस्कृती धर्म, जात, परंपरा यांच्या प्रभावाखाली अडकवून ठेवले. पुरूषप्रधान व्यवस्थेने स्वत:ला इतिहासाची संस्कृतीची मांडणी केली. त्यामध्ये स्त्रीचा विचार हा दुय्यम पातळीवरच केला गेला. नंतरच्या काळात सांस्कृतिक, आर्थीक राजकीय अशा सर्वच क्षेत्रांत नव्या आर्थिक धोरणाने आपला ठसा उमटवायला सुरूवात केली त्याचा खुप मोठा परिणाम एकुणच मानवी जीवनावर झाला. स्त्रियांच्या हक्कासाठीच्या अनेक चळवळी जगभर उभ्या झाल्या. स्त्रीयांना अभिव्यक्त होण्याचे अनेक मार्ग खुले होत गेले. त्यानंतरची स्त्रीवादी कविता ही काव्याभिरूची जपण्यापेक्षा स्त्रीला तिच्या अस्मितेची जाणीव करून देते. स्त्रीला आलेल्या अनुभवाचे चित्रण करते. त्यामुळेच १९९० नंतरची स्त्रीवादी कविता ही अगोदरच्या स्त्रीवादी कवितेपेक्षा निश्चितपणे वेगळी ठरते. स्त्रीचा सबंध ज्या ज्या गोष्टींशी घटनांशी येतो त्या घटना प्रसंगाची अभिव्यक्ती नंतर स्त्रीवादी भूमिकेतून घेतांना दिसते. स्त्रीवादी कविता स्त्रीवादी विचारसरणीनुसार सशक्तपणे अविष्कृत तर होतेच त्याच बरोबर पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांना विकासाच्या संधी का नाकरण्यात आल्या याचाही शोध होते. स्त्रीची दुय्यम अवस्था बदलण्यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्थे विरूध्द सर्व सामर्थ्यानिशी संघर्ष करते. पुरूषप्रधान संस्कृतिने केवळ स्त्रीला उपभोग्य वस्तू मानल्यामुळे तिच्या विकासाच्या वाटाच खुंटल्या होत्या. आत्मगौरव, आत्मविश्वास, स्वाभिमान, स्वावलंबन स्वातंत्र्य सामाजिक व धार्मीक कार्यातील दुय्यम वागणूक यामुळे स्त्रीला कोणताच हक्क नाही. या परिभाषेत भारतीय स्त्री आली परंतु स्त्रीवादाने, स्त्रीवादी चळवळीने स्त्री समान हक्काचा नारा देवून कायद्यानेही स्त्री विषयक कायदे करून स्त्रीयाची सुरक्षा वाढविली.

ISBN-978-93-95494-00-7

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वतंत्र लेखनामुळे कवयित्री ज्योती लांजेवार यांची एक वेगळी ओळख आहे. त्यांच्या कवितेत इतर सामाजिक जाणिवां बरोबरच दलित समाजातील स्त्रिया, त्यांच्या व्यथा, वेदना, दु:ख, परंपरा आणि धर्माच्या नावाखाली झालेल्या मनाचा कोंडमारा अशी अनेक आशयसुत्रे मांडली गेलेली आहेत.स्त्री म्हणून वाट्याला आलेलं जगणं आणि त्यातील दु:ख हे कोणत्याही वर्गातील स्त्रीला एकत्र आणणारी जाणीव आहे.

आयुष्य रोजच चिंध्या झाले<br>
तुझ्या इतके कोणी फाटले नाही,<br>
हप्त्या हप्त्याने श्वास घेतांना<br>
सूर्याला काही वाटले नाही.

इथे या कवितेत कवयित्री इतर स्त्रियांचा जगण्याशी आणि दु:खासी भावनिक पातळीवर नाते जोडते. संस्कृतिने, धर्माने ठळक केलेल्या बाईपणाच्या व्यथा-वेदना प्रकट केल्या आहेत. निरजा यांची कविता तर स्त्रीच्या दु:खानुभवाचे विविध कंगोरे प्रकट करते. स्त्रीचे दु:ख हे स्त्रीत्व लाभल्यापासूनच सुरू होते.

ती वयात येते<br>
तेव्हाच संपून जाते<br>
..... पुढील आयुष्यांच्या<br>
लक्तरांचे आमंत्रण म्हणून

त्यांच्या नजरेतील शोधकपणा हा प्रखरपणे त्यांच्या कवितेतुन उमटला आहे. १९९० नंतरच्या स्त्रीवादी कवितेचे वेगळेपण काय आहे हे निरजांची कविता नेमकपनाने सांगून जाते. कुटुंबाच्या परिघातील व परिघाबाहेरील जगाचे दर्शन स्त्रीवादी दृष्टिकोनातून त्यांची कविता घडविते. एकट्या जगणाऱ्या स्त्रियांना समाजात वावरतांना येणाऱ्या अनुभवाचे दाहक वर्णन आणि मानवी सबंधाची अनुभूती यांचे चित्रण करते. त्यांच्या जवळपास सर्वच कवितांचा विषय १९९० नंतरच्या समाज जीवनातील स्त्री स्त्रीमध्ये असणारी मैत्री हेच आहेत. प्रत्येक कविता ही आत्मशोध घेत असते. विचार भावना आणि चिंतन आणि महानगरीय संस्कृतीत गुदमरणारी संवेदनशील स्त्रीचे भावविश्व हे त्यांच्या कवितेचे विषय आहेत.

अलिकडच्या काळात स्त्रीकवितेच्या स्वरूपात निश्चितच बदल झाला आहे. याला कारण स्त्रीवादी जाणीवविश्वाचा प्रस्तुत कवितेवर असलेला प्रभाव होय. अनुजा जोशी या नविन पिठीच्या कवयित्रींच्या कवितेतून मानसिक पातळीवर स्त्रीच्या अस्तित्वाविषयी चाललेल्या संघर्षाला काव्यरूप मिळून स्त्री अनुभवांना मुक्त असा अवकाश प्राप्त झाला आहे. अनुजा जोशी हे मराठी कवितेत स्थिर झालेले एक महत्वाचे

ISBN-978-93-95494-00-7

नाव स्त्रीवादी जानिवेने प्रथमच स्त्रीच्या जगण्याला, तिच्या पुरूषाविषयीच्या भावविश्वाला अधोरेखीत करते. पुरूषप्रधान सामाजिक संरचनेला विरोध करून एक माणूस म्हणून ओळख निर्माण करण्याचा निग्रह ही स्त्री धाडसाने मांडू पाहते.

मानवी मुल्यांची ही परिक्षा
उत्तीर्ण व्हायची आहे मला.
माणुस नावाचा
शिलालेख लिहून !

या कवितेत स्वतःच्या जगण्याकडे नव्या भानातून बघण्याचे सामर्थ्य आणि स्त्रीच्या मर्यादित अवकाशा विषयी पुरूषप्रधान व्यवस्थेला दिलेला नकार केंद्रस्थानी आहे.अनुराधा पाटील यांची कविता साधेपणा जोपासते परंतु अधिक अर्थगर्भता प्राप्त करून देते. त्यामुळे ती अधिक प्रत्ययकारी बनते. त्यांच्या कवितेत मातृहृदयाची व्यथा, संपूर्ण जीवनाच्या दुःखमयतेची शोकगर्भ जाणीव, जीवनाच्या निरर्थकतेची, अज्ञान शक्तीच्या विनाशकारी सामर्थ्याची आणि जगण्याचा प्रत्येक श्वास आपणास विनाशकाकडेच ठरतो आहे. असे वेगळेभाव साकार होत जातात. पोरी या कवितेतही स्त्रीजीवनाला वेढून असलेल्या दुःखाच्या विविध परी प्रकटल्या आहेत.

पुलाच्या कठड्यावर
पाय झुलवत बसलीय मुलगी,
मी विचार करते
ती मोठी झाल्यावर
इकडे उडी घेईल की तिकडे?

आपल्या भविष्यात काय काढून ठेवले आहे याची पुसटशीसूध्दा कल्पना नसलेल्या पोरी चा निरागसपणा अनुराधा पाटील टिपतात. बाईच्या आयुष्याविषयी त्या संघर्षाविषयी चर्चा खुप होते पण बाई म्हणून येणारे भोग अपरिहार्यपणे त्या बाईलाच भोगावे लागतात. स्वातंत्र्योत्तर नंतरच्या महत्वाच्या कवयित्री मलिका अमरशेख त्यांच्या कवितेतील सामाजिक जाण अत्यंत प्रगल्भ आहे. वर्गीय, जातीय विषमतेची जाणीव आणि ती विषमता दूर करण्यासाठी करावी लागणारी प्रयत्नांची पराकाष्ठा यांची प्रगल्भ मांडणी त्यांनी प्रखरपणे केली आहे.

कधि त्या हरिण होतात
वाघाच्या रक्ताळ जबड्यातलं
तर कधी प्रत्यचा लावलेला पारधी
कधी त्या मूळ बनतात प्रत्येक संघर्षांच

ISBN-978-93-95494-00-7

स्त्री ही सृजनशील आहे. ती निर्मिती आहे, पण अपुर्णत्वाची वेदना घेऊन या स्त्रीयांचा अर्थहीन असा प्रवास अव्याहतपणे चालूच असतो. ही अपुर्णत्वाची आणि एकाकीपणाची जाणीव स्त्रीच्या आत्मशोधाचा एक भाग आहे. स्त्री जाणीवेच्या या कवयित्रींनी मराठी कवितेच्या क्षेत्रात मोठी भरीव अशी कामगिरी केली आहे. स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी कविता ही खऱ्या अर्थाने स्त्रीयांच्या भावनांचा सामर्थ्यांचा ठाव घेणारी आहे. स्त्री सामर्थ्याचा अनेक पैलू आपल्या कवितेतून दर्शवून स्त्रीवादी काव्यक्षेत्रात मोलाची भर टाकली असे म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) सरकटे सदाशिव : स्त्रीवादी साहित्य
२) पाटणकर वसंत : स्वातंत्र्योत्तर मराठी कविता
३) जाधव गजानन, मुंदे गजानन : काव्यसरिता
४) भालेराव इंद्रजित : कविता रूचलेली आणि सुचलेली